नियमित फौजदारी ख. क्र. ४०४/२०२५.
निशाणी क्र. १४/क
सरकार वि. सुकदेव तडवी

सदर साक्ष नोंदवितांना आरोपी न्यायालयासमक्ष व्ही.सी.द्वारे हजर.

जप्ती पंचनामा करणारे पोलीस अधिकारी.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.०५.

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | साहेबराव मोतीलाल खांडेकर |
| वय | : | ४१ वर्षे, |
| धंदा | : | नोकरी पोहेकॉ ११२३ |
| सध्या ने. | : | शहादा पोलीस ठाणे, |

सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. पाडवी यांचेकडून:

१. शहादा पो.स्टे. येथे नोंद असलेला गुन्हा क्र. ५१८/२०२५ याचा तपास माझ्याकडे देण्यात आलेला होता. तपासाचे कामी मला प्रथम खबरी अहवाल, केस डायरी प्राप्त झाले. दि. २१.०९.२०२५ रोजी आमच्याकडे गुन्हा क्र. ५१८/२०२५ दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हयात आमच्याकडे एक मोटारसायकल चोरी झालेली होती. दि. २१.०९.२०२५ रोजी आम्ही सुकदेव साईनाथ तडवी यास अटक केली. अटक केल्यानंतर त्यास विचारपूस केली. तेव्हा त्याने सांगितले की, मी सदर गुन्हयातील मोटारसायकल चोरी केली असून शिरपूर व सेंधवा येथे मागील वर्षी चो–या केलेल्या आहेत, त्या मोटारसायकलींची नंबर प्लेट बदलून मी वापरत होतो.

२. आरोपीने असे सांगितल्यावर आम्ही ०२ पंच शहादा पो.स्टे ला बोलाविले. पंचांसमक्ष त्याचे निवेदन घेतले. निवेदन पंचनाम्यात त्याने आम्हाला असे सांगितले की, चोरी केलेल्या मोटारसायकली मी लपवून ठेवलेल्या आहेत, मी त्या तुम्हाला काढून देतो. त्यानंतर आम्ही सरकारी वाहनाने दोन पंचांसह त्याने सांगितलेल्या ठिकाणी दोंडाईचा रस्त्याने रिलायन्स पेट्रोल पंप मागे एका पडक्या झोपडीच्या बाजूला गेलो. तेथे पांढ–या रंगाच्या प्लॅस्टीकच्या

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.02.27 18:11:53 +0530

कागदाखाली ०५ मोटारसायकल लपवून ठेवल्या होत्या. त्या मोटारसायकली आम्ही पंचांसमक्ष जप्त केल्या. त्यामध्ये हिरो कंपनीची एच.एफ. डिलक्स, हिरो कंपनीची स्प्लेंडर या गाडया होत्या व त्यांचे नंबरप्लेट बदललेले होते.

३. सदर मोटारसायकली मी पंचांसमक्ष जप्त केल्या. त्यांचा जप्ती पंचनामा केला. तसेच आरोपीचा निवेदन पंचनामाही तयार केला. त्यावर दोन पंचांच्या सहया घेतल्या. सदर पंचनाम्याची प्रमाणित प्रत मी शिरपूर पो.स्टे.ला दिली. सदर पंचनाम्याची प्रमाणित प्रत पाहिली असता, मी ओळखु शकतो. आता मला जप्ती व निवेदन पंचनाम्याची प्रमाणित प्रत दाखवली. ती तीच असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. तसेच पो.नि. यांची प्रमाणित प्रत केल्याबाबतची सही आहे. पंचांनी माझ्या समक्ष पंचनाम्यावर सही केल्याने त्या मी ओळखतो. पंचनामा दि. २२.०९.२०२५ रोजी १२.५५ ला सुरु होवून १३.३५ ला समाप्त झाला. सदर **जप्ती व निवेदन पंचनाम्याची प्रमाणित प्रतीस** **निशाणी क्र. पी–१/पीडब्लू–५** देण्यात येत आहे. सदर गुन्हयातील जप्ती व निवेदन पंचनाम्याची मुळप्रत मी आमच्या शहादा पो.स्टे. अंतर्गत गुन्हा क्र. ५१८/२०२५ ज्यामध्ये मी तपासी अधिकारी आहे त्यामध्ये दाखल केलेली असल्याने यामध्ये त्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे.

४. जेथे मोटारसायकली मी जप्त केल्या तेथून त्या मोटारसायकली मी शहादा पो.स्टे. ला आणल्या. त्यानंतर मी मुद्देमाल पावती फाडली. दि. २६.०९.२०२५ रोजी शिरपूर पो.स्टे. च्या पोहेकॉ २७१ सी एस सोनवणे यांनी पत्रव्यवहार केला की, शिरपूर शहर पो.स्टे. गुन्हा क्र. ७०८/२०२४ या गन्हयात मोटारसायकल चोरी झाली आहे ती तुम्ही तुमच्या गुन्हयात जप्त केली आहे. ती मोटारसायकल त्यांच्या गुन्हयात परत करण्याची त्यांनी विनंती केली. तशी विनंती केल्याने मी त्यांच्याकडून त्यांचे पत्र तसेच त्यांच्या गुन्हयातील प्रथम खबरी अहवाल प्राप्त केला. त्यानंतर त्यांच्या मोटारसायकलला नंबरप्लेट वेगळी लावली होती. परंतू, त्यांनी केलेल्या पत्रामध्ये इंजीन क्रमांक व चेसीस क्रमांक जुळवून पाहिला असता, तो एकच

POOJA NARAYAN KOKATE Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE Date: 2026.02.27 18:13:54 +0530

निघाल्याने सदर मोटारसायकल त्यांना मी परत दिली. तशी शहादा पो.स्टे. स्टेशन डायरीला नोंद केली आहे. त्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे मी माझ्या गुन्हयाची प्रथम खबर, जप्ती पंचनामा व मुद्देमाल पावती दिली होती. सदर मुद्देमाल पावतीची प्रमाणित प्रत मी त्यांना दिली होती. सदर मुद्देमाल पावती दाखवली असता, मी ओळखु शकतो. आता मला सदर मुद्देमाल पावतीची प्रमाणित प्रत दाखवली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. सदरील **मुद्देमाल पावतीच्या प्रमाणित प्रतीस निशाणी क्र. पी–२/पीडब्लू–५** देण्यात येत आहे. नि.क्र. पी–२/पीडब्लू–५ वर मुद्देमाल अ.क्र. ४ वर नमूद जी मोटारसायकल आहे ती शिरपूर पो.स्टे. अंतर्गत गुन्हयाबाबत आहे. आरोपी नंबरप्लेट बदलून गाडया वापरत असल्याने सदर मोटारसायकलवर दुसरी नंबरप्लेट होती.

५. माझ्या अंतर्गतच्या गुन्हयाचे तपासाकामी ज्या आरोपीस मी अटक केले होते त्यास पाहिले असता, मी ओळखु शकतो. आज रोजी सदर आरोपी व्ही.सी. द्वारे न्यायालयात हजर आहे. तो तोच आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.जे. पाटील यांच्यामार्फतः**

६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुकदेव याचे स्वतंत्ररित्या निवेदन मी काही घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरील फॉर्मवर मी हाताने लिहिलेले नाही. निवेदन पंचनामा नि.क्र. पी–१/पीडब्लू–५ वर आरोपीने कोणत्या तारखेला निवेदन दिले व किती वाजता दिले हे पहिल्या पानावर नमूद नाही. सदरील दिनांक व वेळ ही निवेदन पंचनाम्याच्या तिस–या पानावर नमूद आहे असे साक्षीदार स्वतःहून सांगतात. सदर निवेदन पंचनाम्याची तारीख दि. २२.०९.२०२५ असून त्याची वेळ १२.५५ ते १३.३५ अशी आहे.

७. ज्या प्लॅस्टीक पालाखाली आरोपीने मोटारसायकली झाकून ठेवल्या होत्या तो पाल मी जप्त केला नाही. सदर मोटारसायकली आमच्या कर्मचा–यांनी ढकलत आणल्या. कोणते

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.02.27 18:13:57 +0530

कर्मचारी त्याकामी माझेसोबत होते हे मी सांगू शकत नाही. ते ०५ लोक होते. मी, दोन पंच, आरोपी व गाडी चालक आणि गाडी क्रमांक मी पो.स्टे. च्या स्टेशन डायरीला नोंद केलेली आहे. ज्यावेळेस या गाडया सापडल्या त्यावेळेस मी त्या नेण्यासाठी पोलीस कर्मचा–यांना फोन करुन बोलाविले.

८. हे म्हणणे खरे आहे की, मी गाडया मुद्देमाल कारकूनाच्या ताब्यात दिल्या. सदर मुद्देमाल पावतीवर त्या गाडया त्यांच्या ताब्यात दिल्याबाबत मुद्देमाल कारकूनाची सही मी घेतली नाही. मुद्देमाल कारकूनास गाडया ताब्यात दिल्याबाबत वेगळा पंचनामा केला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, त्याची तशी काही गरज नाही.

९. पोहेकॉ चेतन सोनवणे हे माझ्याकडे दि. २६.०९.२०२५ रोजी मोटारसायकल ताब्यात घेणेकामी आले व त्यादिवशी मी त्यांना सदर मोटारसायकल ताब्यात दिली. पोहेकॉ सोनवणे यांना सदर दिनांकास गाडी ताब्यात दिल्याबाबत मी स्टेशन डायरीला नोंद घेतली. हे म्हणणे खरे नाही की, सदर आरोपीचा या मोटारसायकलीशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, शिरपूर पो.स्टे. अंतर्गत चोरी झालेल्या मोटारसायकलीशी या आरोपीचा काही संबंध नाही.

१०. सोनवद गावापासून शहादा पो.स्टे. पर्यंतचे अंतर ०८ कि.मी. एवढे आहे. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती व निवेदन पंचनाम्याचे पंच हे सोनवद गावचे रहिवाशी असून ते आमचे नेहमीचे पंच आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.02.27 18:14:01 +0530

शिरपूर.
दिनांक २७.०२.२०२६.

(श्रीमती पूजा ना. कोकाटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१),
शिरपूर, जि. धुळे.
**JO Code-2489**